# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे - ४०११०१ दुरध्वनी क्र. २८१८११८२, २८१९२८२८.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र.मनपा/कर/ 2006 /२५-२६ दि. 28/12/२०२५

## आदेश

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने दि. १४/१०/२०२५ च्या पत्रान्वये मतदार यादी तयार करण्याबाबत दिलेल्या कार्यक्रमानुसार आणि त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणेनुसार दि. २०/११/२०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रारुप याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या.

ज्याअर्थी, सदर मतदार याद्यांवर दि. २०/११/२०२५ ते दि. ०३/१२/२०२५ पर्यंत हरकती व सूचना मागविण्यात आल्या आणि सदर हरकती व सूचना विचारात घेऊन दि. १५/१२/२०२५ रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या.

ज्याअर्थी, सदर मतदार याद्या प्रसिद्ध केल्यानंतर त्यामध्ये तपासणीतील चुकांमुळे अथवा कंट्रोल चार्ट अपलोड करताना झालेल्या चुकांमुळे सोबतच्या परिशिष्टात दर्शविलेले मतदार ज्या प्रभागात असणे आवश्यक आहे, त्याप्रभागाऐवजी दुसऱ्या चुकीच्या प्रभागात समाविष्ट झाल्याचे मतदार यादी तयार करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले.

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाचे मतदार यादी विभाजनासंदर्भातील दि. १६/०७/२०२५ च्या आदेशातील परिच्छेद क्र. ८ अन्वये अशा दुरुस्त्या नामनिर्देशनपत्रे भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत करण्याबाबत तरतूद आहे. तसेच याअनुषंगाने चुकांची दुरुस्ती करण्याबाबत दि. २५/११/२०२५ अन्वये आदेशीत केले आहे.

ज्याअर्थी, मतदार यादीतील सदर दुरुस्त्या वेळीच करुन त्यानुसार सुधारीत पुरवणी याद्या प्रसिद्ध करणे आवश्यक असल्याची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दि. १६/०७/२०२५ व दि. २५/११/२०२५ च्या आदेशानुसार सोबतच्या परिशिष्टातील मतदारांना त्यांच्या नावासमोर / यादीनिहाय क्रमांकासमोर अंतिम मतदार यादीत दर्शविलेल्या चुकीच्या प्रभागाऐवजी त्यापुढे दर्शविलेल्या योग्य प्रभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

सदर आदेश महानगरपालिकेच्या वेबसाईटवर टाकून त्याची योग्य ती प्रसिध्दी करण्यात येत आहे.

**(राधाबिनोद अ. शर्मा,** भा.प्र.से.)
**निवडणूक अधिकारी**
**तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**